# <u>प्रेस नोट</u> <u>दिनांक १३/०६/२०१९</u>
## <u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>
## <u>कामगार महिला, पुरुषांची मिटींग घेवुन त्यांना सुरक्षेसंबधाने मार्गदर्शन केले बाबत</u>.

दिनांक १३/०६/१९ रोजी सकाळी १०. ते १०.३० वा. दरम्यान चंदननगर पोलीस हद्दीमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली सुंदराबाई मराठे शाळेच्या जवळील चौकामध्ये एकत्रीत आलेल्या कामगारांची पोहवा. हरीदास कदम, पोना. अनिरुध्द जायभाये यांनी मिटींग घेवुन त्यांना कामगारांचे न्याय्य अधिकार, कामाचे ठिकाणी त्यांचेवर होणाया अन्यायापासुन सरक्षन यासंबधाने मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. तसेच सुरक्षा संबधाने पोलीस आयुक्तालयाकडून राबविण्यात येणाया योजनांची व भरोसा सेलचे कामकाजाविषयी माहिती देवुन त्याचा लाभ घेणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. शहरामध्ये होणाया वाहन चोया, घरफोडी अशा गुन्हयांना आळा घालणेसाठी करावयाच्या उपाययोजना, संशयीत वस्तु किंवा इसमाबाबत पोलीसांना तात्काळ माहिती देणे अशा प्रकारे सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर मिटींगसाठी सुमारे १०० चा जनसमुदाय उपस्थित होता. मिटींगदरम्यान घेण्यात आलेला फोटो खाली सादर केला आहे.



